# जपानी पुष्परचना - भाग १२

यावेळी तिन्ही रचना पांढऱ्या पुष्पापात्रांमध्ये केल्या आहेत. कमीतकमी फुलांचा वापर केला आहे. जपानी पुष्परचनेचे हे वैशिष्ट्य आहे.




पहिल्या रचनेत एक जेरबेरा, बेबीज ब्रेथ आणि सुपारीची फुले वापरली आहेत. लांब पाने वापरून लाईन्स निर्माण केल्या आहेत, ज्या रचनेची शोभा वाढवत आहेत.

रचना २ आणि ३ मधे सारखेच पुष्पपात्र वापरले आहे - पांढऱ्या रंगाचे.







काही फुले दोन्ही रचनेत वेगवेगळी वापरली आहेत. रचना २ मध्ये पांढरा जेरबेरा आहे. रचना ३ मध्ये पिवळी शेवंती आणि कोंबड्याची फुले वापरली आहेत.

थोडासा बदल केला तर रचना कशी वेगळी दिसते हे लक्षात येते. थोडा थोडा बदल करत एका रचनेतून अनेक रचना निर्माण करता येतात. असे प्रयोग करता करता हळूहळू सृजनशीलता वाढत जाते असे अनुभवास येते. करून पहा तुम्ही पण!!

**सौ. अरुंधती देशपांडे**

ई-मेल asdssd@gmail.com